# गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

महाराष्ट्र शासन अधिसुचना क्रमांक २००७/(३२२/०७) विशी - ५ महाराष्ट्र अधिनियम १९९४ (१९९४ चा महा. ३५) च्या कलम ३ च्या पोटकलम (२) अन्वये दिनांक २७ सप्टेंबर, २०११ रोजी स्थापीत व महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ (सन २०१७ चा महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम क्रमांक ६) व्दारा संचालित राज्य विद्यापीठ )

**(महाविद्यालय व विद्यापीठ विकास विभाग)**

एम.आ.डी.सी. रोड, कॉम्प्लेक्स, गडचिरोली -४४२६०५ E-Mail : college.section@unigug.ac.in

जा. क्र./ गों. वि. /म. वि. वि. वि./ 373/2024 दि. 28-02-2024

## परिपत्रक

**विषय :-** महाविद्यालयात एका विषयाकरिता किमान एक तरी पुर्ण वेळ नियमित शिक्षक व प्राचार्य यांची नियुक्ती करण्याबाबत.

**संदर्भ :-**१. दिनांक १३ /१२/२०२३ रोजी संपन्न झालेल्या मा. विद्यापरिषदेतील बाब क्रमांक ४४ च्या अनुषंगाने.
२.विद्यापीठाचे परिपत्रक क्रमांक गों.वि./मविविवि/२६४५/२०२२ दिनांक १०/०६/२०२२

उपरोक्त संदर्भाकिंत विषयांन्वये विद्यापीठाशी संलंग्नित सर्व महाविद्यालयांना कळविण्यात येते कि, ज्या महाविद्यालयात एक नियमित शिक्षक अथवा प्राचार्य नाही अशा महाविद्यालयांनी तातडीने भरण्याबाबत विद्यापीठाचे संदर्भ क्रमांक २ च्या परिपत्रकाव्दारे कळविण्यात आले होते. तथापी महाविद्यालयांनी नियमित शिक्षक व प्राचार्यांची नियुक्ती करण्याबाबत पुनश्चः दिनांक १३/१२/२०२३ रोजी संपन्न झालेल्या मा. विद्यापरिषदेच्या सभेमध्ये खालील प्रमाणे निर्णय घेण्यात आलेला आहे.

**" गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोलीच्या कार्यक्षेत्रातील महाविद्यालयांनी एका विषयाकरिता किमान एक तरी पुर्ण वेळ शिक्षक व प्राचार्य नेमणे आवश्यक आहे. तसे न केल्यास शैक्षणिक सत्र २०२४-२५ पासून सदर महाविद्यालयातील प्रवेश प्रक्रिया थांबविण्याचा ठराव सभेतील मान्यवरांनी एकमताने केला. "**

करिता उक्तप्रमाणे झालेल्या निर्णयानुसार संस्था/महाविद्यालयांनी तातडीने प्राचार्य व शिक्षकांची पदे भरण्याबाबतची कार्यवाही घ्यावी. जी महाविद्यालये प्राचार्य अथवा शिक्षकांची पदे भरणार नाही अशा महाविद्यालयातील शैक्षणिक सत्र २०२४-२५ पासून सदर महाविद्यालयातील प्रवेश प्रक्रिया थांबविण्यात येईल व त्याची सर्वस्वी जबाबदारी ही संस्था/महाविद्यालयाची राहील , याची नोंद घ्यावी.

मा. प्र- कुलगुरू यांच्या मान्यतेनुसार

28/02/2024

(श्री. रविंद्र जुनघरी)
सहाय्यक कुलसचिव(प्र.)
गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली.

**प्रति,**

अध्यक्ष/सचिव/प्राचार्य,
सर्व संलंग्नित महाविद्यालये,
गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली.

**प्रतिलीपी :-**

१. मा. कुलगुरू महोदय यांचे स्विय सहाय्यक, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली.
२. मा. प्र-कुलगुरू महोदय यांचे कार्यालय, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली.
३. मा. कुलसचिव यांचे कार्यालय, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली.